# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

**(महाराष्ट्र शासन अंगिकृत)**

उद्योग सारथी, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

# शुध्दीपत्रक

**दि.२५/०७/२०१९**

**विषय : संगणक अर्हता (MSCIT व टंकलेखक) पात्रतेबाबत.**

संदर्भ : १) महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाचा शासन निर्णय क्र. मातंस २०१२/प्र.क्र.२७७/३९, दि.०४/०२/२०१३

२) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण-१११४/प्र.क्र.२००/१६-अ, दि.०४/०९/२०१५.

म.औ.वि. महामंडळाच्या सरळसेवा भरतीप्रक्रियेअंतर्गत विविध १४ संवर्गातील ८६५ पदे भरणेकामी दि. १५/०७/२०१९ रोजी वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. त्याचप्रमाणे महामंडळाच्या व महापरीक्षा पोर्टल यांच्या संकेतस्थळावर दि.१७/०७/२०१९ रोजी विस्तृत जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर जाहिरातीमध्ये उक्त संदर्भांकित शासन निर्णयाचा समावेश करण्यात आला नसून सदर शासन निर्णय संगणक अर्हता (MSCIT व टंकलेखक) आवश्यक असलेल्या पदांकरीता लागू राहील त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

महाराष्ट्र शासनाच्या उक्त संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासनाच्या गट अ, ब आणि क मधील कर्मचाऱ्यांना MSCIT या संगणकीय अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र धारण करणे अनिवार्य आहे. तथापि, शासनाच्या संदर्भीय शासन निर्णयामध्ये क्र.१ ते क्र.५ मधील कोणतीही संगणक अर्हता धारण करीत असलेल्या उमेदवारास संगणक अर्हता उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल. त्याचप्रमाणे सदर उमेदवार संगणक अर्हता (MSCIT) आवश्यक असलेल्या पदाकरीता अर्ज सादर करु शकतो.

त्याचप्रमाणे संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी, सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी व पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी या सर्व घटकातील उमेदवार जर लिपीक टंकलेखक पदावर नियुक्तीस पात्र ठरले तर टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाच्या आत टंकलेखकनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी मुदतवाढ देण्यात येत आहे.

वरील बदलाव्यतिरिक्त महामंडळाच्या व महापरीक्षा पोर्टल यांच्या संकेतस्थळावर दि.१७/०७/२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या विस्तृत जाहिरातीमध्ये कोणताही बदल नाही.

महाव्यवस्थापक (मबवि)
मऔविम, मुंबई-९३